संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# नव्या सरकारला कर्जाची पहिली सलामी

**नवे** सरकार स्थापन होत असतानाच मुख्यमंत्र्यांनी एका रुग्णाला पहिला मदतीचा चेक दिला. तिथून जरी राज्य कारभाराची सुरुवात झाली असली तरी त्याच्या दोन दिवस आधीच म्हणजेच शपथविधीच्या पूर्वसंध्येला नव्या सरकारला कर्जाची सलामी मिळालेली आहे. जागतिक बँकेने १ हजार ५९३ कोटींचे विकासकर्ज मंजूर केले आहे. इंटरनॅशनल बँक ऑफ रिकन्स्ट्रक्शन अँड रिडेव्हलपमेंट या बँकेने राज्याच्या मागास भागाच्या विकासासाठी हे कर्ज मंजूर केले आहे. प्रामुख्याने इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि तेही मागास भागाच्या विकासासाठी पहिल्यांदाच असे वेगळे कर्ज मिळालेले आहे. राज्याच्या विकासाची नेहमीच ग्वाही दिली जाते. परंतु त्यासाठी पैसा कुठून आणायचा हा नेहमीचा प्रश्न असतो. जी काही विकासकामे होत आहेत, त्यासाठी कर्ज घेतल्याशिवाय पर्याय उरत नाही. सध्या महाराष्ट्रावर नऊ लाख कोटींचे कर्ज आहे. आणि ते सगळे विकासासाठीच असल्याचा दावा केला जातो. आता त्या कर्जात आणखी ही नवी भर पडली आहे. विकासासाठी स्पर्धा करीत असताना कर्जाचा विळखाही अनिवार्य ठरतो, असा त्याचा अर्थ घ्यावा लागतो. म्हणूनच विकासाची गणिते मांडताना जे काही कर्ज घेतली जातात. त्याच्या परतफेडीचेही गणित मांडता आले पाहिजे. आता मिळालेले कर्ज हे पंधरा वर्षांच्या मुदतीसाठी मिळाले आहे. या पंधरा वर्षांत त्याची परतफेड होणार आहे का, याची खात्रीसुद्धा सरकारला देता आली पाहिजे. म्हणजे मग घेतलेल्या कर्जाचा या ठराविक मुदतीत या विशिष्ट कारणांसाठीच उपयोग झाला असे सांगता येऊ शकते. दुर्दैवाने महाराष्ट्रावर वाढत चाललेला कर्जाचा डोंगर हा निधीचा योग्य वापर होत नसल्याचेच निदर्शक आहे. विकासासाठी कोणतेही राज्य सरकार उत्सुक असते. आपल्या कार्यकाळामध्ये अधिकाधिक विकासाची कामे व्हावीत, असा त्यामागचा हेतू असतो. परंतु विकासाला आवश्यक ते अर्थकारण प्रत्यक्षात पाहायला मिळत नाही. त्यामध्ये मोठी तफावत दिसून येते.

### कर्जाचा वाढता डोंगर

पायाभूत विकासाची कामे होताना दिसतात. त्याचा उपयोगही होतो. परंतु या सर्वांचा तो आर्थिक भार निर्माण होतो. त्याचा विचार केला तर विकासासाठी केला जाणारा कर्जरूपी खर्च हा जनतेच्या खिशातूनच वसूल केला जातो. हीदेखील वस्तुस्थिती आहे. आज मोठमोठे रस्ते, मेट्रो किंवा अन्य सेवासुविधा निर्माण होत असल्या तरी त्यावर होणारा खर्च आणि त्यातील अपेक्षित उत्पन्न याचा मेळ कधीच बसत नाही. आणि राजकारणी मंडळी त्याचा मेळ बसूही देत नाही. अगदी याचे ताजे उदाहरण म्हणजे वेगवेगळ्या रस्त्यांच्या वापरासाठी आकारला जाणारा टोल म्हणावा लागेल. त्याचे तर्कशास्त्र मांडताना रस्तेबांधणीसाठी आलेला खर्च हा टोलमधून वसूल व्हावा. तो खर्च भरून निघाला की, टोल घेणे बंद करावे असे साधारण त्याचे गणित मांडले जाते. परंतु मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर गेली पंधरा-वीस वर्षे वसूल होणारा टोल खर्च भरून निघाला तरी घेतला जातो. कारण नंतर मग रस्त्याच्या देखभालीचा खर्च त्या टोलमधूनच भागवायचा असतो. असे अफलातून कारण पुढे केले जाते. जेणेकरून टोल नावाच्या प्रकारातून अनेक संबंधितांचे खिसे भरत राहतात. याचा अर्थ विकासाचे प्रकल्प राबवत असताना खर्चाचा अंदाज सांगितला जातो. पण उत्पन्नाबाबत सगळीच सरकारे मौन असतात. आतादेखील मागास भागाच्या विकासासाठी जे पंधराशे कोटींचे कर्ज मिळणार आहे त्यात मागास भागासाठी नेमके कोणते प्रकल्प अनिवार्य आहेत, जे खऱ्या अर्थाने मागास भागाला दिलासा देऊ शकतील. आणि या कर्जाची परतफेड करताना हे सरकार कोणत्या पद्धतीने करणार आहे हेदेखील सांगता आले पाहिजे. तरच कर्जाचे कारण आणि त्याचसाठी ठेवले जाणारे तारण नेमकेपणाने लक्षात येईल. अन्यथा कर्जाचे डोंगर वाढत राहतात. पण त्याची परतफेड होत नाही. अशी आज सर्वसाधारण परिस्थिती आहे. सातत्याने वाढत जाणारा हा कर्जाचा डोंगर जर सामान्य माणसाच्या डोक्यावर बोजा टाकणारा ठरणार असेल तर त्याबाबतचा आढावा खूप गरजेचा ठरतो.

### जागतिक आर्थिक केंद्राचे स्वप्न

अलिकडे तर महाराष्ट्राला जगाचे आर्थिक केंद्र करण्याचीही वल्गना झालेली आहे. आर्थिक केंद्र करायचे असेल तर ते स्वयंपूर्ण असणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा ते कर्जात बुडालेले आर्थिक केंद्र असेच त्याचे वर्णन करण्याची वेळ येईल. अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्राकडे प्रगती किंवा आर्थिक विकासाचा स्त्रोत मोठा आहे. आणि जर अशा प्रकारचे आर्थिक सशक्त चित्र महाराष्ट्राच्या वाट्याला आले असेल तर ते जपण्याचे कामही करावे लागेल. वेगाने विकास करायचा आहे, हे जरी खरे असले तरी त्या वेगाच्या नादामध्ये राज्याचे आर्थिक भान सुटता कामा नये. आज नऊ लाख कोटींचे कर्ज हा काही छोटा आकडा ठरत नाही. प्रत्येक राज्याची एक आर्थिक पतही रिझर्व्ह बँकेकडे असते. आणि ती पत पाहून कर्ज घेण्याची मर्यादादेखील ठरवली जाते. यापूर्वीसुद्धा सरकारकडून या कर्जाचे समर्थन करताना महाराष्ट्र पंधरा लाख कोटींपर्यंत कर्ज देऊ शकते एवढी त्याची रिझर्व्ह बँकेकडे आर्थिक पत आहे. परंतु इतकी मोठी आर्थिक पत असताना ती केवळ कर्जामध्ये खर्ची घालणे किंवा एकाअर्थी ही आर्थिक पतच कर्जासाठी गहाण ठेवणे हा प्रकार कितपत आर्थिक शहाणपणाचा ठरतो, हे नक्कीच विचारात घ्यावे लागेल. भविष्यकाळात जर आर्थिक केंद्र करायचे असेल तर राज्याचे आर्थिक उत्पन्न वाढवणे हे सर्वात महत्त्वाचे ठरते. ते उत्पन्न वाढवतानासुद्धा त्याचा बोजा सामान्य माणसावर पडता कामा नये. याचेही भान ठेवले जाणे महत्त्वाचे ठरते.